# महाराष्ट्र शासन

| | |
|---|---|
| तात्काळ<br>mail - govind.kamble@nic.in | क्रमांक:- प्रवेश-२०१९/प्र.क्र.१३६/एसडी-२<br>शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,<br>मादाम कामा मार्ग, हुतात्मा<br>राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई-३२<br>दिनांक :- २९ जून,२०१९ |

प्रति,

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

**विषय** :- इ.११ वी प्रवेशाच्या अनुषंगाने आयसीएसई या मंडळाच्या विद्यार्थ्यांच्या सरासरी गुणांबाबत.

**संदर्भ** :- १) शासन समक्रमांकाचे पत्र दि.०३ जून,२०१९ व दि. १९ जून, २०१९
२) मा.उच्च न्यायालयाचे दि.२७ जून, २०१९ चे आदेश

आय.सी.एस.ई. मंडळाच्या विद्यार्थ्यांना बेस्ट ऑफ फाइव्ह ची निवड करण्याकरिता मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. १३ जुलै २०१० चे आदेश पुढीलप्रमाणे आहेत.

a) For applying Best of Five rule, ICSE students are allowed to choose any five subjects out of six subjects from Group I and Group II only.

b) If the ICSE student desire to consider marks scored in the subject from Group III then such student can not apply "Best of five rule". Such student shall be required to consider marks scored in all the seven subjects in which he/she is examined.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्याकडून प्राप्त पत्राच्या अनुषंगाने आय.सी.एस.ई विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेमध्ये ६ विषयांच्या गुणांसंदर्भात दि. १९ जून, २०१९ च्या पत्रानुसार आदेश देण्यात आले होते. तथापि, मा.सर्वोच्य न्यायालयाचे वरिल नमूद आदेश तसेच, मा.उच्च न्यायालयाने आय.सी.एस.ई. विद्यार्थ्यांच्या गुणांबाबत दि.२७ जून, २०१९ रोजी दिलेले आदेश विचारात घेऊन, शासनाचे दि.१९ जून, २०१९ चे पत्र अधिक्रमित करण्यात येत आहे.

३. आय.सी.एस.ई. मंडळाच्या विद्यार्थ्यांच्या राज्य मंडळाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये इ.११ वी मध्ये प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्यांच्या गुणांबाबत खालीलप्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहे.

i. " आय.सी.एस.ई मंडळातर्फे ६ विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे केवळ ग्रुप I व ग्रुप II मधील कोणत्याही ५ विषयांचे सरासरी गुण (Percentage Marks) इ.११ वी प्रवेशाकरिता ग्राहय धरण्यात यावेत."

ii. आय.सी.एस.ई मंडळातर्फे ७ विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे २ पर्याय उपलब्ध राहतील.

(अ) ज्या विद्यार्थ्यांना बेस्ट फाइव्ह चा लाभ घ्यावयाचा आहे, अशा विद्यार्थ्यांचे ग्रुप **I** व ग्रुप **II** मधील सहा विषयांपैकी कोणतेही पाच विषयांचे बेस्ट फाइव्ह गुण ग्राह्य धरण्यात येतील. (अशा विद्यार्थ्यांनी ग्रुप **I** व ग्रुप **II** मधील बेस्ट फाइव्ह गुण भरावेत)

**किंवा**

**(आ)** ज्या विद्यार्थ्यांना ग्रुप **III** मधील गुण विचारात घेण्याची इच्छा आहे, त्या विद्यार्थ्यांचे ग्रुप **I**, ग्रुप **II** व ग्रुप **III** मधील सात विषयांची (७०० गुण) सरासरी ग्राह्य धरण्यात येईल. (अशा विद्यार्थ्यांनी ७०० पैकी एकूण गुण भरावेत.)

४. सदर आदेश यापुढील प्रवेश फेऱ्यांकरिता लागू राहतील. तरी, यानुषंगाने संबंधित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या भाग १ व २ मध्ये आवश्यक सुधारणा करण्याकरिता संबंधित आय.सी.एस.ई शाळा अथवा मार्गदर्शन केंद्रांशी संपर्क करावा. दि.२९ जून, २०१९ ते दि.४ जुलै, २०१९ या कालावधीत विद्यार्थ्यांनी भाग १ व २ मध्ये आवश्यक सुधारणा करुन घ्याव्यात. शाळा/मार्गदर्शन केंद्रे यांच्याकरिता सविस्तर सूचना विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी निर्गमित कराव्या.

उपरोक्तनुसार आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरून करण्यात यावी.

29/6/2019

**(गोविंद कांबळे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

## Subject Scheme of I.C.S.E. for the Examination at the end of Class X

| Sr. No. | Group I (Compulsory) | Percentage External Examination | Marks Internal Assessment |
|---|---|---|---|
| 1. | English | 80% | 20% |
| 2. | A Second Language (one/two) | 80% | 20% |
| 3. | History, Civics and Geography | 80% | 20% |
| | **Group II (any two/three of the following subjects)** | | |
| 4. | Mathematics | 80% | 20% |
| 5. | Science (Physics, Chemistry, Biology) | 80% | 20% |
| 6. | Economics | 80% | 20% |
| 7. | Commercial Studies | 80% | 20% |
| 8. | A Modern Foreign Language | 80% | 20% |
| 9. | A Classical Language | 80% | 20% |
| 10. | Environmental Science | 80% | 20% |
| | **Group III (any one of the following subjects)** | | |
| 11. | Computer Applications | 50% | 50% |
| 12. | Economic Applications | 50% | 50% |
| 13. | Commercial Applications | 50% | 50% |
| 14. | Art | 50% | 50% |
| 15. | Performing Art | 50% | 50% |
| 16. | Home Science | 50% | 50% |
| 17. | Cookery | 50% | 50% |
| 18. | Fashion Designing | 50% | 50% |
| 19. | Physical Education | 50% | 50% |
| 20. | Yoga | 50% | 50% |
| 21. | Technical Drawing Applications | 50% | 50% |
| 22. | Environmental Applications | 50% | 50% |
| 23. | A Modern Foreign Language | 50% | 50% |

**Note:** It is expected that candidates will normally offer both Science and Mathematics from Group II. If they choose to take any other combination of subjects, Heads of Schools must apprise them of the implications. For admission to the I.S.C. XII Course, all combinations of subjects will be accepted.